निगराणी

# केळीवरील रोग आणि किडींचे नियंत्रण




**नितीन गवळी**
(मो. ८३०८३२३४४५)
सहायक प्राध्यापक, उद्यानविद्या महाविद्यालय,
सरळगाव, ता. मुरबाड, जि. ठाणे

**आशुतोष पाटील**
आचार्य पदवी विद्यार्थी,
वनस्पती विकृतिशास्त्र विभाग, वसंतराव नाईक
मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी




फळपिकांमध्ये आंबा या पिकाखालोखाल केळी हे मुख्य पीक महाराष्ट्र आणि इतर राज्यांमध्ये बागायती फळपीक म्हणून घेतले जाते. आपल्या विशिष्ट अशा गोड चवीमुळे केळी सर्वांना परिचित आहे. परंतु सध्याच्या काळात या पिकावर विविध प्रकारचे रोग आणि किडी यांचा प्रादुर्भाव झालेला आढळतो. परिणामत: केळी उत्पादनावर मोठ्या प्रमाणात परिणाम होऊन शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. ते टाळण्यासाठी रोग आणि किडींचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

भविष्यातील नुकसान टाळण्यासाठी केळी पिकावरील रोग व किडींची सखोल माहिती शेतकरी बांधवांना असणे आवश्यक आहे. सदर लेखात आपण केळी पिकावरील प्रमुख रोग व किडींची माहिती आणि त्यांच्या नियंत्रणासाठीचे उपाय याबद्दल माहिती जाणून घेऊया.

## १. पनामा (मर) रोग

हा एक कवकजन्य रोग असून तो प्रामुख्याने फ्युजॅरिअम ऑक्सिस्पोरम क्युबेन्स (Fusarium oxysporum f. Spp. Cubense) या मातीजन्य बुरशीमुळे होतो. बुरशीचा प्रवेश मुख्यत: मुळ्यांमार्फत झाडाच्या शरीरात होतो. मर रोगाचा प्रादुर्भाव हा अयोग्य निचरा व भारी जमिनीमध्ये जास्त प्रमाणात आढळून येतो. झाडाची खालची (जुनी) पाने आणि कडा पिवळ्या पडू लागतात ही या रोगाची प्राथमिक लक्षणे आहेत.



**पनामा (मर) रोग**

(Panama Wilt Disease)

**नुकसान :**

* झाडाची पाने पिवळी पडून वाळू लागतात. * फळे खराब होतात. * रोगग्रस्त पाने वाळून झाड मरण पावते.

**उपाय :**

* काढणीनंतर बागेतील रोगग्रस्त पाने, फळे आणि झाड नष्ट करावे. * मातीचे परीक्षण व मूलद्रव्ये यांची उपलब्धता वेळोवेळी पडताळून पाहून उपाययोजना करावी. * रोगास प्रतिकारक जाती बसराई, लालकेळ, हरिसाल व पूवन यांसारख्या सुधारित जातींची लागवड करावी. * मर्क्युरी क्लोराईड (२००० पीपीएम) किंवा व्हॅपाम (११२ ग्रॅम) दर २० लिटर पाण्यात मिसळून वापरावे.

## २. शेंडा झुपका (बंचीटॉप) रोग

हा एक विषाणूजन्य रोग असून तो प्रामुख्याने बनाना बंची टॉप व्हायरस (Banana Bunchy Top Virus ) या विषाणूमुळे होतो.



**शेंडा झुपका रोग**

(Banana Bunchy Top Virus )

**नुकसान :**

* झाडे खुजी व पानेही तोकडी होतात. * पानांचा आकार वेडावाकडा झालेला दिसतो. * झाड रोगग्रस्त झालेले दिसते. * रोगाचा प्रसार प्रामुख्याने रोगट कंद व मुनवे तसेच तुडतुडे, मावा या किडींमुळे होतो. * उत्पादनामध्ये फार घट जाणवते.

**उपाय :**

* लागवड करताना विषाणुमुक्त कंद व मुनवे यांचा वापर करावा.

* रोगग्रस्त केळीचे झाड उपटून काढून टाकावे. * रोगग्रस्त कंद व मुनवे लवकर कळण्यासाठी बाग स्वच्छ आणि तणमुक्त ठेवणे आवश्यक. * रोगप्रतिकारक बसराई या जातीची लागवड करावी. * तुडतुडे व मावा या किडींचा उत्तमरित्या बंदोबस्त करावा. * तुडतुडे नियंत्रणासाठी मोनोक्रोटोफॉस ४ मि.ली. (१:४) या प्रमाणात फवारणी ४५ दिवसांच्या बारी बारीने फुले येण्यापर्यंत चालू ठेवावी.

## ३. घडांच्या दांड्याची सडण



**घडांच्या दांड्याची सडण**

हा एक कवकजन्य रोग असून तो प्रामुख्याने बुरशीमुळे होतो.

**नुकसान :**

* केळीच्या

घडाचा मुख्य दांडा काळा पडून सडतो. * केळीच्या घडावर परिणाम होऊन योग्य बाजारभाव मिळत नाही. * सूर्यकिरणांच्या दिशेने असलेल्या घडावर याची चिन्हे स्पष्ट दिसतात.


**उपाय :**

* केळीच्या घडांना योग्य आच्छादन देऊन त्यांचे संरक्षण करावे. * घडावर झाडाची पाने बांधावीत. ४:४:५० च्या बोर्डो मिश्रणाचा घड लहान असताना फवारा घ्यावा. * घडांचे किडींपासून योग्य संरक्षण करावे, त्यामुळे रोगप्रसार होण्यास आळा बसेल.

### ४. सिगाटोका (केळी करपा) रोग

हा एक कवकजन्य रोग असून प्रामुख्याने मायकोस्फॅरेल्ला म्युसिकोला (Mycospharella Musicola) या बुरशीमुळे होतो.





सिगाटोका (केळी करपा) रोग

**नुकसान :** * पानांवर पिवळ्या रंगाचे लहान ठिपके पडून पुढे ते मोठे होतात व संपूर्ण पान करपून जाते. * पानांपाठोपाठ फळाच्यां वर देखील ठिपके पडू लागतात व फळांची गुणवत्ता ढासळते. * रोगाचा प्रसार होण्यास पाऊस, दव आणि तापमानातील वाढ कारणीभूत आहे. * मोठ्या प्रमाणात रोगाचा प्रसार हा पावसाळ्यात तापमान (२१ अंश सेल्सिअस) वाढीमुळे होतो.

**उपाय :**

* रोगग्रस्त पाने काढून जाळून नष्ट करावीत. * केळीची बाग तणमुक्त व स्वच्छ ठेवून वेळेवर कंद व मुनवे काढावे. * निरोगी कंद व मुनवे लागवडीसाठी वापरावेत. * झाडांमधील अंतर योग्य ठेवावे. * पाण्याचे योग्य व्यवस्थापन करून पाणी साठू न दिल्यास रोगाचा प्रसार टाळता येतो. * पानांवर कॉपर ऑक्सिक्लोराईड (३ ग्रॅम प्रतिलिटर पाणी) किंवा थिओफॅनेट मिथिल (१ ग्रॅम प्रतिलिटर पाणी) मिसळून फवारणी करावी.

## किडी व त्यांच्या नियंत्रणाचे उपाय

### १. कंद व खोड भुंगा

कंद व खोड प्रौढ भुंगा, कंद व खोड भुंग्याची अळी



**नुकसान :**

* कंद व खोड भुंग्याची अळी कंद व खोड यांचा भाग पोखरते. * कंद लागवडीस अयोग्य होतात. * कंद व खोड यांवर बुरशीचा प्रादुर्भाव होऊन ती कुजू लागतात. कालांतराने संपूर्ण झाड मरते.

**उपाय :**

* भुंग्यांच्या नियंत्रणासाठी झाडावर ०.०५ टक्के एन्डोसल्फान आवश्यक त्या प्रमाणात फवारावे. * पॅरिस ग्रीन औषध + धान्याचे पीठ (१.५) यांच्या विषारी गोळ्या बनवून कंदाच्या जवळ टाकाव्यात. *

दूषित कंद जाळून नष्ट करावे.

**पानांवरील भुंगे**



**पानांवरील प्रौढ भुंगे (Banana Leaf Beetle )**

**नुकसान :** * पानांवरील भुंगे पावसाळ्यात झाडावरील पाने व फळे कोरतात व खातात. * पानांची व फळांची वाढ योग्य प्रमाणात होत नाही. परिणामत: योग्य बाजारभाव मिळत नाही.

**उपाय :**

* रोगग्रस्त पाने व फळे गोळा करून नष्ट करावीत. * बागेतील तण व्यवस्थापन केल्यास तणनाशक व कीटकनाशकांचा वापर कमी होऊन आर्थिक बचत होते.

**३. पानांवरील मावा**



**पानांवरील मावा (Banana Mealy Bugs)**

**नुकसान :** * मावा ही कीड उष्ण व सर्द दिवसात पाने व कोवळ्या फळातील रस पितात. * फळांच्या आकारात विकृती दिसते. * घडांमध्ये फळांची वाढ खुंटते. * पाने व्यवस्थित वाढत नाहीत.

**उपाय :** * रोगग्रस्त पाने आणि फळे काढून नष्ट करावीत. * तणांचे योग्य व्यवस्थापन करावे. * बागेची योग्य निगा राखावी. * मावा किडीचा उद्रेक जास्त असेल तर गुप्ट्रोल ५५० (२५० ग्रॅम औषध प्रति १००० लिटर पाणी) मिसळून फवारावे.

**४. फळावरील तुडतुडे**

**नुकसान :** * तुडतुडे फळांच्या सालीतील रस शोषून





**फळांवरील तुडतुडे**

पितात, त्यामुळे फळाची साल फाटते. * कीडग्रस्त झाड हे काळ्या बुरशीमुळे काळपट झालेले दिसते. * वातावरणातील आर्द्रतेमुळे तुडतुड्यांचा उद्रेक हा जास्त प्रमाणात झालेला आढळतो. * तुडतुडे हे प्रामुख्याने पानांच्या खालच्या बाजूला आढळून येतात. * शेंडा झुपका (बंची टॉप) रोगाचा प्रसारास तुडतुडे कारणीभूत असतात.

**उपाय :** * एन्डोसल्फान १५० मि.ली. १०० लिटर पाणी हे मिश्रण फवारावे. * गरजेनुसार गुप्ट्रोल ५५० हे औषध फवारणे.

अशा प्रकारे केळी पिकावरील रोग आणि किडींची योग्य माहिती शेतकऱ्यांना असेल तरच उपाय करण्यास शेतकऱ्यांना खूप मदत होईल. परिणामत: त्याचा फायदा केळी उत्पादनावर होऊन बागेतल्या मालाला योग्य बाजारभाव मिळेल. ■